पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १२/०६/२०२०*

# निष्पाप आदिवासी बांधवाचा नक्षलवाद्यांकडुन खुन

*उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या पोमके गट्टा (जां.) मौजा किदरटोला येथील रहिवासी रवि जुरु पुंगाटी वय २८ वर्ष यास आपले घरी असतांना सायंकाळी ७.०० वाजताच्या सुमारास अंदाजे १५ ते २० बंदुकधारी नक्षलवादी घरी येवुन त्यास बळजबरीने सोबत घेवुन गेले. रवि पुगाटी यांचा मुतदेह आज रोजी कोठी ते गट्टा (जां.) रस्त्यावर आढळुन आला. क्रुर नक्षलवाद्यांनी रवि पुंगाटी यांच्या डोक्यात गोळी मारुन त्यांचा खुन केला. रवि पुंगाटी यांच्या पश्चात पत्नी नामे सरीता व ३ मुले असुन १ मुलगी नामे आशा वय ५ वर्ष, मुलगा सवर्ण वय २ वर्ष व साजन वय ३ महीने व आप्तपरिवार आहे.*

*रवि पुंगाटी शेतमजुरी करुन आपले कुटुंबाची उपजिवीका करीत होता. त्याला अत्यंत लहान वयाची मुले आहेत. त्यांच्या उपजिवीकेसाठी तो दिवसरात्र कष्ट करत असतांना त्याच्या लहान मुलांचीही नक्षलवादयांना किंचीतही दया आली नाही. क्रुर नक्षलवादयांनी स्वतःच्या स्वार्थासाठी रविचा खुन केला आहे. नक्षलवादी गडचिरोली जिल्हयातील निष्पाप आदिवासी बांधवांचा खुन करुन स्वतःचा फायदा पाहात आहेत. रवि पुंगाटी हा घरचा कर्ता होता. त्याला ३ महिन्याचे लहान बाळ असतांना निष्पाप बाळाच्या वडीलांचा खुन नक्षलवादयांनी केला आहे. पंचक्रोशीतील नागरिकांनी या घटनेचा तिव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. नक्षलवादयांच्या या निदर्यतेने जनमानसात नक्षलवादयांबाबत तिव्र असंतोष निर्माण झाला आहे. एकीकडे तेंदुपत्ता कंत्राटदारांकडुन पैसे उकळवुन आपली स्वतःची तुंबडी भरणारे नक्षलवादी दुसरीकडे सामान्य आदिवासी बांधवांच्या विषयी काहीही देणेघेणे नसलेले नक्षलवादी अशाप्रकारे निघृणपणे खुन करत आहेत.*

*नक्षलवाद्यांचा निषेध करणाऱ्या गावकऱ्यांनी पुढे येवुन नक्षलवाद्यांना गावबंदी करावी गडचिरोली पोलीस दल सर्व ग्रामस्थांना सर्वोतोपरी मदत करेल, असे आश्वासन मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी केले आहे.*